# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk16.dte@gmail.com Website : www.dte.org.in


अतितात्काळ
ई-मेल द्वारे

क्रमांक : १६/आस्था/मलैछ/२०१३/२३८०
दिनांक : 13 नवम्बर NOV 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती व नागपूर.
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रलंबित तक्रारींचा अहवाल सादर करणेबाबत.
संदर्भ : शासन पत्र क्रमांक : इएसटी-२०१२/प्र.क्र.२८१/आस्था-१, दिनांक २३.०९.२०१३.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासन पत्र, शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०१३/(११/१३)/तांशि-१, दिनांक ०९.१०.२०१३ सोबत या संचालनालयास प्राप्त झालेले आहे. वरील संदर्भिय पत्रान्वये शासनाने खाली नमूद मुद्यांबाबतची माहिती, महिला व बाल विकास विभागास सादर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित केलेले आहे.

१. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळाच्या अनुषंगाने आतापर्यंत आपल्या विभागांतर्गत किती प्रकरणे प्राप्त झाली होती व त्या तक्रारींवर कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी.
२. तसेच, विद्यापीठाच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा यांनी बांदा कॉलेज, सिंधुदुर्ग येथील लैंगिक छळाच्या तक्रारीची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून योग्य ती दखल घेतली नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणली आहे. तरी सदर कॉलेज आपल्या संचालनालयाच्या अधिपत्याखाली येत असल्यास, सदर प्रकरणाची सद्य:स्थिती या संचालनालयास सादर करण्यांत यावी. (सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांनी या मुद्यांबाबतची माहिती सादर करावी.)

वर नमूद मुद्यांबाबतची माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असल्यामुळे आपल्या विभागाची माहिती दिनांक २०.११.२०१३ पूर्वी या संचालनालयास सादर करण्यांत यावी, जेणेकरुन माहिती शासनास सादर करणे शक्य होईल.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१३/ 8419
दिनांक 16 NOV 2013

अतितात्काळ
प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महा.औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद,
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर, नि.म.त.नि.लातूर

उपरोक्त संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक छळाच्या अनुषंगाने आतापर्यंत आपल्या संस्थेत किती प्रकरणे प्राप्त झाली होती व त्या तक्रारींवर कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबतची माहिती तात्काळ ई-मेलद्वारे या कार्यालयास सादर करावी जेणेकरुन सदर माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल. तसेच माहिती निरंक असल्यास तसे कळविण्यात यावे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव, या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

Pl. send copy of email on estsection.roaurangabad@gmail.com